# बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यासंदर्भात आमदार ओगले यांनी वेधले वनमंत्र्यांचे लक्ष

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघांमध्ये होणाऱ्या बिबट्यांच्या हल्ल्यासंदर्भात राज्याचे वनमंत्री गणेश नाईक आणि आमदार हेमंत ओगले यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथिगृह, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.



यावेळी अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांच्यासह वनविभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघात वाढत्या बिबट्यांच्या हल्ल्याकडे आ. हेमंत ओगले यांनी मंत्री गणेश नाईक यांचे लक्ष वेधले. यावेळी बोलताना आ. ओगले म्हणाले की, शहर आणि गावाकडे येणारे सर्व बिबटे हे नरभक्षक असून गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर बिबट्यांचा वावर होताना दिसून येत आहे. त्यामध्ये मनुष्यहानीसह पशुहानी देखील होताना दिसत आहे. त्यामुळे नागरिक आणि शेतकरी कायमच भयभीत असतात. नरभक्षक बिबट्यांच्या संदर्भात राज्य शासन आणि केंद्र शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे आमदार ओगले यांनी सांगितले.

यावेळी मंत्री गणेश नाईक म्हणाले की, बिबट्यांच्या हल्लयां संदर्भात शासन संवेदनशील आहे आणि या विषयावर लवकरच धोरणात्मक निर्णय घेण्याचा विचार आहे. बिबटे पकडण्यासाठी पिंजऱ्यांची संख्या देखील वाढविण्यात आली आहे. आ.ओगले यांच्या मागणीनुसार श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघासाठी अतिरिक्त पाच पिंजरे देण्याचे मंत्री महोदयांनी आश्वासित केले. त्यामुळे येणाऱ्या काळात बिबटे पकडणे अधिक सोयीचे होणार आहे.

# विवाहितेशी असभ्य वर्तन गुन्हा दाखल

**राहुरी (प्रतिनिधी)–** दारुच्या नशेत असलेल्या एकाने त्याच्या ३२ वर्षीय विवाहित मैत्रीणीशी असभ्य वर्तन केल्याची घटना राहुरी तालुक्यात घडली आहे.

एका ३२ वर्षीय विवाहित तरुणीचे संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथील अक्षय कैलास आहेर याच्यासोबत मैत्रीचे संबंध होते. दोघांचे फोटो व व्हिडिओ अक्षय आहेर याच्या मोबाईलमध्ये आहेत. १६ जून रोजी सदर तरुणी राहुरी तालुक्यातील तिच्या नातेवाईकांकडे आली होती. १७ जून रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास सदर तरुणी तिच्या नातेवाईकांच्या शेतात घास कापत होती. त्यावेळी तिचा मित्र अक्षय दारू पिऊन तेथे आला. त्याने तरुणीशी असभ्य वर्तन केले. त्यानंतर तू माझ्यासोबत आली नाहीस तर मी तुला, तुझ्या नवऱ्याला आणि मुलांना जीवंत मारून टाकीन, अशी धमकी देऊन शिवीगाळ केली. माझ्याकडे आपल्या दोघांचे फोटो आहेत. मी व्हायरल करेल, अशी धमकी दिली.

घटनेनंतर तरुणीने राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी अक्षय कैलास आहेर याच्या विरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ३५१ (२), ३५२ प्रमाणे विनयभंग व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार हनुमंत आव्हाड करीत आहेत.

# नगर जिल्ह्यात शनिवारपर्यंत पावसाची शक्यता

## हवामानतज्ज्ञ खुळे यांची माहिती

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** नगर जिल्ह्यासह नाशिक, पुणे, जळगाव, नंदूरबार यासह सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये आजपासून शनिवार (दि.२८) जूनपर्यंत मध्यम तर घाट क्षेत्रात जोरदार पावसाची शक्यता, असल्याची माहिती हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी सार्वमतला दिली.

संपूर्ण उत्तर भारतात मान्सून त्याच्या नियमित वेळापत्रकाप्रमाणे म्हणजे त्याचे सरासरी तारखेचे सातत्य ठेवून पुढे झेपावत आहे. सध्या देशाचा साधारण ८५ टक्के भाग मान्सूनने व्यापला असून पुढील १५ दिवसात कदाचित तो संपूर्ण देश काबीज करण्याची शक्यता जाणवते. गेल्या काही दिवसापासून महाराष्ट्र ते केरळ किनारपट्टीत मान्सून जबरदस्तपणे कोसळत आहे. कोकण किनारपट्टीप्रमाणे संपूर्ण गुजराथ व मध्यप्रदेशातही मान्सून सेट झाला आहे. त्याच्या प्रेरित परिणामातूनच महाराष्ट्रातील खान्देश-नाशिकसह मध्य महाराष्ट्रात मान्सून-पावसाच्या आशा काहींश्या पल्लवीत झाल्या आहेत. रविवारपासून पुढील सात दिवस म्हणजे शनिवार २८ जूनपर्यंत नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूरसह मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यात मध्यम पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील घाट क्षेत्रात मात्र जोरदार पावसाची शक्यताही नाकारता येत नाही.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना असे दोन जिल्हे वगळता बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यात पुढील १० दिवस म्हणजे मंगळवार १ जुलैपर्यंत केवळ ढगाळ वातावरण राहून अगदीच तुरळक ठिकाणी किरकोळ पावसाची शक्यता जाणवते. मंगळवार २४ जूनपासुन पुढील पाच दिवस म्हणजे शनिवार २८ जूनपर्यंत विदर्भातील बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया जिल्ह्यात जोरदार पावसाची शक्यता वाढली आहे. उर्वरित वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात मात्र मध्यम पावसाची शक्यता आहे. मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात पुढील १० दिवस म्हणजे मंगळवार १ जुलैपर्यन्त जूनपर्यंत सध्या जाणवतो, तसा जोरदार ते अति जोरदार पावसाची शक्यता ही कायम असल्याचे खुळे यांनी सांगितले.

# गोदावरी दुथडी भरून वाहत आहे, पण परिसरात पाऊस उघडला



**पुणतांबा (वार्ताहर)–** नाशिक जिल्ह्यात जोरदार पाऊस सुरू असल्यामुळे सध्या पुणतांबा येथे गोदावरी नदी दुथडी भरून वाहत आहे. मात्र, परिसरात पावसाने उघडीप दिल्यामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे.

गोदावरी नदीला पाणी आले तरी त्याचा जास्तीत जास्त फायदा नदीकाठच्या ग्रामस्थांना होतो. पुणतांबेकरांना तर भर पावसाळ्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासते. परिसरात १० दिवसांपूर्वी सरासरी २ इंच पावसाची नोंद झाली होती, त्यानंतर समाधानकारक पाऊस पडलेला नाही. अवकाळी पावसामुळे काही शेतकऱ्यांनी खरीप पिकांच्या पेरण्या केल्या आहेत. अजूनही बरेच शेतकरी वर्ग टप्प्याटप्प्याने द्विधा मनस्थितीत पेरणी करत आहेत, कारण निसर्गाचा लहरीपणा शेतकरी वर्गाला माहित आहे. सोयाबीनसह काही पिकांची पेरणी १५ जुलैपर्यंत केली तरी चालते; त्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांनी थांबा आणि पहा अशी भूमिका घेतलेली आहे. अजूनही परिसरात विहीरींच्या पाण्याच्या पातळीत वाढ होईल असा पाऊस पडलेला नाही. पावसाने ओढ दिल्यामुळे परिसरातील शेतकरी चिंताग्रस्त दिसून येत आहेत. गोदावरी दुथडी भरून पाणी आले तरी गोदावरी उजव्या कालव्याला पूर्ण क्षमतेने पाणी सोडून परिसरातील गणेश बंधारे, गावतळी, सिमेंट बंधाऱ्यात तातडीने कालव्याचे पाणी सोडावे, अशी मागणी येथील दादा सांबारे, संदीप गुंजाळ यांनी केली.

# दत्तनगर गावठाण जागेत शासनाच्या सर्व योजना राबविणार- भंडारी

**टिळकनगर (वार्ताहर)–** जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने तालुक्यातील दत्तनगर गावासाठी दिलेल्या १५ एकर गावठाण जागेत शासनाची एकही योजना शिल्लक ठेवणार नसून सर्व सुख-सुविधा दिल्या जातील. यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांनी प्रस्ताव दाखल करताच मंजूर केले जातील, असे स्पष्ट आश्वासन जि. प. चे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिले.



श्रीरामपूर भेटीदरम्यान आनंद भंडारी यांनी दत्तनगर गावठाण जागेची पहाणी करून माहिती घेतली. याप्रसंगी भंडारी म्हणाले की, जिल्ह्यातील विशेषत: श्रीरामपूर तालुक्यातील दत्तनगर येथील सुरू घरकुल योजना पाहून आपण समाधानी आहोत. या गावच्या घरकुल उभारणीचा आदर्श इतर गावांनी घेतल्यास केंद्र व राज्य सरकारचे स्वप्न साकार होईल, असे स्पष्ट करुन भंडारी म्हणाले की, केंद्र व राज्य सरकारच्या घरकुल अंतर्गत विविध योजना आहेत. उदा. रमाई आवासा योजना, पंतप्रधान आवास योजना, पंतप्रधान सौर ऊर्जा योजना, सौर पथदिवे योजना, अंतर्गत क्रॉंक्रीट रस्ते, भूमिगत गटार, स्वच्छ पिण्याचे पाणी, शबरी आवास योजना यासह अन्य योजना या प्रशस्त जागेवर उभारल्या जातील. यासाठी श्रीरामपूर पं. स. अधिकाऱ्यांनी सर्व कामांचे एकत्रीत प्रस्ताव जि. प. अहिल्यानगरकडे सादर करावे, त्यास टप्प्या-टप्प्याने शासकीय अनुदानासह मंजुरी दिली जाईल, आनंद भंडारी म्हणाले. तसेच मंजूर असलेल्या घरकुलापेक्षा वाढीव प्रस्ताव सुचविल्यास ते तात्काळ मंजूर केले जातील, असे त्यांनी सांगितले.

चर्चेदरम्यान श्रीरामपूर बाजार समितीचे संचालक नानासाहेब शिंदे, गटविकास अधिकारी सिनारे, विस्तार अधिकारी चऱ्हाटे व श्री. ठाकरे यांनी भाग घेत स्थानिक पातळीची माहिती दिली, तसेच पं. स. स्तरावर जास्तीत जास्त मदत केली जाईल, असे आश्वासन दिले.

माजी उपसरपंच नानासाहेब शिंदे यांनी दत्तनगर गावच्या घरकुल योजनेची संपूर्ण माहिती दिली असता मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांनी या योजनेचे व येथील नियोजनाचे कौतुक केले आणि आपण दत्तनगर गावचा घरकुल प्रकल्प राज्यात आदर्श प्रकल्प म्हणून तयार होईल यासाठी संपूर्ण प्रयत्न करू, असे सांगितले.

याप्रसंगी रिपाईचे भिमाभाऊ बागुल, भिमशक्ती अध्यक्ष संदिप मगर, ग्रा.पं. सदस्य सागर भोसले, सुधीर ब्राम्हणे, राजु मगर, राजू खाजेकर, संजय बोरगे, सामाजिक कार्यकर्ते अशोक लोंढे, संदिप बागुल, पंकज बागुल, जनार्दन खाजेकर, प्रदीप गायकवाड, शरद भणगे, सुरेश शिवलकर, संजय पठारे, अष्टविनायक मित्र मंडळाचे राजस शिंदे, विकी भागवत, रफिक बागवान, मोसीन शेख, अक्षय शेलार, कमलेश वाघेला, तुषार भागवत, डॉ. राकेश गायकवाड, प्रशांत सरोदे. प्रदिप शेळके, सागर कदम, आकाश रंधे, अरशद शेख, तौफिक शेख, संजय वाघेला, करण वाघेला, राहुल बागुल, स्वप्नील देशपांडे, निखिल गायकवाड, परिमल देशपांडे, गुलाम जहागिरदार, अरबाज बागवान, निखिल जगदाळे, कुंदन रासकर, राजू उदावंत, गणेश वाघ, निलेश खैरणार, बाबा जाधव, नाना जाधव, अक्षय सरोदे, राजु त्रिभुवन, निलेश खाजेकर, आदित्य अमोलिक, विकी रंधे, बाळू निंबाळकर, संदिप निंबाळकर, संदिप बागुल यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. आभार ग्रामसेवक रुबाब पटेल यांनी मानले.

# टाकळीभान येथील श्रीराम व साईबाबा मंदिर पायी दिंड्यांचे पंढरपूरकडे प्रस्थान

**टाकळीभान (वार्ताहर)–** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील श्रीराम मंदिर व श्री साईबाबा मंदिरातून श्री क्षेत्र टाकळीभान ते श्री क्षेत्र पंढरपूर पायी दिंडी पालखी सोहळ्याचे काल रविवार दि.२२ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान झाले.

येथील महिला किर्तनकार व प्रवचनकार संगीताताई महाराज शेजुळ यांच्या प्रमुख अधिपत्याखाली श्रीराम मंदिरातून पायी दिंडी आषाढी वारी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली. या दिंडी सोहळ्यात रामभाऊ महाराज मुठे, संदिप महाराज सोनवणे, संदिप महाराज कोळपे, गोकुळ महाराज नाग, रविंद्र महाराज गांगुर्डे, गोरक्षनाथ महाराज चव्हाण, सुरेश महाराज बनकर, सचिन महाराज वाघुले यांची किर्तन व प्रवचन होणार आहेत. श्री संत साईबाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्री साईबाबा मंदिरातून गंगागिरी महाराज, नारायणगिरी महाराज यांच्या शुभाशीर्वादाने तसेच प.पू. शांतीब्रम्ह भास्करगिरी महाराज, रामगिरी महाराज यांच्या प्रेरणेने आणि समाज प्रबोधनकार राधेश्याम महाराज पांडागळे व युवा कीर्तनकार गोपाल महाराज काळे यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्रामस्थ मंडळ, टाकळीभान महिला भजनी मंडळांच्या सहकार्याने हा श्री संत साईबाबा पायी पालखी दिंडी सोहळा रविवार २२ जून रोजी पंढरपूरकडे मार्गस्थ झाला.

या पायी पालखी दिंडी सोहळ्यात विठ्ठल प्रासादिक भजनी मंडळ, रुख्मिणी महिला भजनी मंडळ टाकळीभान, गुरुदत्त भजनी मंडळ, तसेच पंचक्रोशीतील भजनी मंडळांनी सहभाग घेतला. या दोन्ही दिंडी सोहळ्यात मोठ्या प्रमाणात वारकरी सहभागी झाले. गावात विविध संस्थांच्या वतीने दोन्ही दिंड्यांचे स्वागत करण्यात आले. बाजार समितीच्या उपबाजार आवारात उपस्थित वारकऱ्यांना साबुदाना खिचडी प्रसादाचे वाटप करून शुभेच्छा देऊन निरोप देण्यात आला. यावेळी ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# हुंडा घेतला तर लग्नाला जाऊ नका

**पुणे (प्रतिनिधी)–** मुलगी आत्महत्या करते आणि आपण अजूनही हुंड्याविषयी बोलतोय, हीच आपल्या समाजाची शोकांतिका आहे, अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी हुंडा प्रथेवर ताशेरे ओढले. तर महाराष्ट्र हुंडामुक्त व्हावा यासाठी समाजाच्या सर्व स्तरावर प्रयत्न होणं आवश्यक आहे. हुंडा घेतला तर लग्नाला जाऊ नका असा थेट इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या आणि खासदारसुप्रिया सुळेंचा पुण्यात एका कार्यक्रमात दिला. जुलै महिन्यापासून पुढील एक वर्षे संपूर्ण शाळा कॉलेज संस्था मिळून पूर्ण ताकदीने हुंडा विरोधी मोहीम आपल्याला चालवयाची आहे.आपण जेव्हा लग्नाला जातो तर तिथे आधी विचारायचं हुंडा घेतला का? किंवा दिला का? त्याने सांगितले हो तर आपण त्या लग्नाला जायचं नाही. लग्नाचा रुखवत दाखवतात. तिथं गाडी दिसली तर विचारायचं कोणाच्या नावावर आहे कोणी दिली...? आता जी घटना पुण्यात झाली. त्या हगवणे कुटुंबाचे आमचे पाच दशकाचे कौटुंबिक संबंध पण, आज सुशिक्षित कुटुंब, सुना अशा घरात जर मुलगी माहेरी गेली तर सारखं माहेरून गाडी घेऊन ये,मोबाईल घेऊन ये, तुला मोबाईलवर बोलायचं आहे. तर तू तुझ्या हिमतीवर घे ना, असंही पुढे सुप्रिया सुळेंनी म्हटलं आहे.



पुढे बोलताना सुळे म्हणाल्या, ८ मार्चला महिला दिन असतो, पण २२ जूनला आम्ही हा कार्यक्रम करत असतो, देशात पहिल्यांदा याच दिवशी महिला धोरण राबविण्यात आले होते, निर्णय प्रक्रियेत त्या आल्या होत्या. सायबर क्राइम हा त्या वेळी विषय नव्हता,आता मोबाईलमुळे महिलांच्या बाबतीत अनेक क्राइम वाढले आहेत. यात सायबर क्राईम हा मुद्दा वाढवला. आता उद्धव चे पैसे थेट महिलांच्या खात्यात येतात आधी ते नव्हते.

लाडकी बहीण योजनेमुळे पैसे मिळाले चांगलं आहे, पण सामाजिक परिवर्तन झाले का? हा महत्त्वाचा प्रश्न आहे, मी सरकारवर टीका करत नाही, पण महिलांच्या आयुष्यात काय मोठा यामुळे बदल झाला. २१०० रुपये कधी देणार त्यांना वाटेल तेव्हा, जसे शेतकरी कर्जमाफीला म्हणतात, वेळ येईल तेव्हा देऊ याला साडेचार वर्ष जातील त्यांची वेळ यायला. सरकार माध्यमातून अनेक निधी दिले महिलांना स्वतःच्या पायावर उभं करण्यासाठी सरकारने प्रयत्न केले पाहिजेत.

## पान १ वरुन

### अमेरिकेचा इराणच्या अणू उर्जा...

केल्यानंतर काही तासांतच इराणनेही जोरदार प्रत्युत्तर देत इस्रायलवर मोठा हल्ला केला आहे. इराणच्या सशस्त्र दलांनी इस्रायलवर ३० मिसाइलचा वर्षाव केला, ज्यामुळे तेल अवीव आणि इतर प्रमुख शहरांमध्ये स्फोट झाल्याचे आवाज आले. इराणने तेल अवीवच्या बेन गुरियन विमानतळाला आणि इतर इस्रायली शहरांना लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. या हल्ल्यात किमान ११ इस्रायली नागरिक जखमी झाले आहेत.

इस्तंबूल येथे झालेल्या इस्लामिक सहकार्य संघटनेच्या (ओआयसी) परराष्ट्र मंत्र्यांच्या परिषदेच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अरघची यांनी शनिवारी तुर्कीचे अध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगान यांची भेट घेतली.शनिवारी इस्रायलवर इराणी ड्रोन हल्ल्यात जॉर्डन खोऱ्यातील बेट शिया येथे एका इमारतीचे नुकसान झाले. इराणशी सुरू असलेल्या संघर्षादरम्यान, शनिवारी इस्रायलची राजधानी तेल अवीवमधील भूमिगत पार्किंगमध्ये लोकांनी आश्रय घेतला. यादरम्यान, अनेक लोक संगीताचे कार्यक्रम सादर करताना दिसले. शनिवारी ग्रीसमधील अथेन्समध्ये पॅलेस्टिनींच्या समर्थनार्थ आणि इराण-इस्रायल संघर्षाविरुद्ध निदर्शने करण्यात आली. यादरम्यान, एका निदर्शकाने इराणशी युद्ध न करण्याचा बॅनर हातात धरला होता.

**१३ जूनपासून इराणमध्ये ६५७, इस्रायलमध्ये २४ जणांचा मृत्यू**

इस्रायल आणि इराणमधील सुरू असलेल्या संघर्षाचा आज १० वा दिवस आहे. १३ जूनपासून इस्रायलने १० इराणी अणुशास्त्रज्ञांना ठार मारले आहे. इस्रायल डिफेन्स फोर्स (खऊऋ) ने शनिवारी इराणी सैन्याचे ३ कमांडर आणि ४ सैनिक मारल्याचा दावाही केला आहे. अमेरिकास्थित ह्युमन राईट्स ॲक्टिव्हिस्ट्स न्यूज एजन्सीनुसार, १३ जूनपासून इराणमध्ये ६५७ लोकांचा मृत्यू झाला आहे आणि २००० हून अधिक लोक जखमी झाले आहेत.

तथापि, इराणच्या आरोग्य मंत्रालयाने पुष्टी केली आहे की केवळ ४३० नागरिकांचा मृत्यू झाला आहे आणि ३,५०० जखमी झाले आहेत. दरम्यान, इस्रायलमध्ये २४ लोकांचा मृत्यू झाला आहे, तर ९०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत.

### पेट्रोल-डिझेल महागणार...

इस्रायलने इराणच्या गॅस आणि तेल क्षेत्रांनाही लक्ष्य केले. हैफाने त्यांची संपूर्ण रिफायनरी बंद केली आहे. याचा परिणाम तेल उत्पादनावर होईल. रिपोर्टनुसार, तेलाची किंमत प्रति बॅरल १०० डॉलर्सपर्यंत पोहोचू शकते. जर असे झाले तर भारतासह जगभरात महागाई वाढेल.

**महागाई वाढण्याची भीती**

गेल्या काही महिन्यांपासून भारतात महागाई नियंत्रणात आहे. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने रेपो दरात कपात केली होती. पण आता जर कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या तर जागतिक स्तरावर अन्न, कपडे आणि रसायनांच्या किमती वाढू शकतात. याचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवरही होईल. त्याच वेळी, बदललेल्या परिस्थितीत जगभरातील केंद्रीय बँका आता व्याजदर कमी करण्याच्या निर्णयावर पुनर्विचार करताना दिसतील.

शुक्रवारी सेन्सेक्स १०४६.३० च्या वाढीसह ८२,४०८.१७ पॉईंट्सवर बंद झाला. त्याच वेळी, निफ्टी १.२९ टक्के किंवा ३१९.१५ पॉईंट्सच्या वाढीसह २५१२२.४० पॉईंट्सवर बंद झाला. इराण आणि इस्रायलमधील वाढत्या तणावामुळे सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये घसरण होऊ शकते.

### ग्रामपंचायतींची होणार तपासणी

ग्रामपंचायतीद्वारे नियमित कचरा संकलन व वाहतूक व्यवस्थापन, मैलागाळ उपसासाठी उपलब्ध असलेली यंत्रणा व माहितीचा दर्शनी भागावर उल्लेख, धार्मिक स्थळे, शाळा, अंगणवाड्या, बाजारतळ यासारख्या ठिकाणांची स्वच्छता यांचा समावेश राहणार आहे.

### बेलापुरातील बेकरीत गोमांस...

असलेल्या युसुफ अन्वर शेख यांच्या मालकीच्या बेकरीमध्ये गोवंश जातीचे जनावराचे मांस आढळून आले. बेलापूर पोलिसांनी बजरंग दल व विश्व हिंदू परिषदेच्या सर्व कार्यकर्त्यांच्या समक्ष पंचनामा केला असून पशुवैद्यकीय अधिकाऱ्याला पाचरण करून हे मांस गोमांस आहे की नाही याबाबत तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यावेळी युसुफ अन्वर शेख यांच्या पत्र्याच्या शेडमध्ये आयुब कुरेशी विकत असलेले तसेच युसुफ अन्वर शेख यांच्या बेकरीमध्ये ठेवलेले गोमांस असे एकूण ५० किलो गोमांस पोलिसांनी जप्त केले आहे.

### निळवंडेचा साठा ३८ टक्क्यांवर

निळवंडेतील पाणीसाठा रविवारी सायंकाळी ३१६दलघफू (३८.०२टक्के) झाला होता. पावसाबरोबर धुकेही पडत असल्याने कळसूबाई शिखर व कोकणकडा यात हरवल्याचे पाहायला मिळत आहे. शनिवार व रविवार अशी सुट्टी आल्याने पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती.

### थेट जनतेतून सरपंच...

प्रवर्गातील ३१२ तर ओबीसीपैकी १६५ सरपंचपद महिलांसाठी आरक्षित असेल. अनुसूचित जातीसाठी आरक्षित सरपंच पदे १५० असून त्यापैकी ७५ महिलांसाठी. अनुसूचित जमातीसाठी आरक्षित सरपंच पदे ११९ असून त्यापैकी ६०महिलांसाठी आरक्षित राहणार आहेत.

### १,२६५ अंगणवाड्यांना इमारत...

मंदिरात आणि ४७६ अंगणवाड्या भाडोत्री इमारतीत भरवण्यात येत आहेत. यामुळे दरवर्षी महिला बालकल्याण विभागाच्या वतीने मंजूर करण्यात येणारा कोट्यावधी रुपयांचा निधी कोणाच्या घशात जातोय, याचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

भारताची आज वाटचाल जागतिक महासत्तेकडे सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. या वाटचालीत महाराष्ट्र आणि त्यातही नगर जिल्ह्याची घौडदौड सुरू असल्याचे केवळ कागदोपत्री दिसत आहे. जिल्ह्यात सर्वात शेवटचा घटक असणाऱ्या सर्वसामान्य आणि गरीबांच्या लेकरांचा आधार असणाऱ्या पूर्व प्राथमिक शिक्षणाची सोय असणाऱ्या अंगणवाड्याचे विदारक चित्र महिला बालकल्याण विभागाच्या आकडेवारीवरून समोर आले आहे. यात एकट्या नगर जिल्ह्यात १,२६५ ठिकाणी अंगणवाड्यांना केवळ इमारतीच नाहीत, तर त्या ठिकाणी पाण्याची आणि शौचालयाची कोणतीच व्यवस्था नसल्याची माहिती समोर आली आहे. यावरून नगर जिल्हा हा केवळ कागदी घोडे नाचवत असल्याचे विदारक चित्र स्पष्ट होत आहे.

नगर जिल्ह्यात ५,३७५ अंगणवाड्या मंजूर असून यातील केवळ ४,११० अंगणवाड्यांना इमारती आहेत. उर्वरित १,२६५ ठिकाणी स्व इमारत नाहीत. यात देखील ३०५ ठिकाणी भरणाऱ्या अंगणवाड्याच्या इमारती कच्च्या असून २६५ ठिकाणी त्या संबंधित गावातील पर्यायी व्यवस्था असलेल्या जिल्हा परिषद शाळेत भरवण्यात येत आहेत. ९१ अंगणवाड्या संबंधित गावातील ग्रामपंचायतीमध्ये, १४९ ठिकाणी समाज मंदिरांमध्ये, तर ४६५ ठिकाणी भाडोत्री गाजेत अंगणवाड्या भरवण्यात येत आहेत. विशेष म्हणजे मंजूर अंगणवाड्यांपैकी ३,०८७ ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असून तेवढ्याच ठिकाणी शौचालयाची व्यवस्था आहे. यावरून जिल्हा परिषद प्रशासन, जिल्हा प्रशासन, जिल्हा नियोजन यांच्याकडून दरवर्षी मिळणारा कोट्यावधी रुपयांचा निधी कोणाच्या खिशात जातो, याचा शोध घेण्याची वेळ आली आहे.

शून्य ते चार किंवा पाच वर्षातील बालकांना या अंगणवाड्यामध्ये अंगणवाडी ताईंकडून पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या धड्यासोबत आहाराचा पुरवठा करण्यात येतो. तसेच गारोदर मातांना विविध मार्गदर्शन या ठिकाणी होत असून स्वत:ची इमारत नसल्याने या ठिकाणी असलेल्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीस कशा प्रकारे काम करत असतील, याचा विचार करण्याची वेळ आता प्रशासनावर आली आहे. एरवी रस्ते, उड्डाणपूल, मंदिर यासह अन्य विकास कामांवर कोट्यावधी रुपये उधळणार्या सर्व घटकांना आता विचार करण्याची वेळ आली आहे.

**शासनाच्या अंगणवाडी सेविकांच्या माथी**

जिल्ह्यात महिला बालकल्याण विभागाचे २१ प्रकल्प कार्यरत असून, या ठिकाणी साडेपाच हजार अंगणवाडी सेविका आणि मदतनीस कार्यरत आहेत. त्यांच्यावर महिला बालकल्याण विभागासह आरोग्य विभाग आणि ऐनवेळी शासनाकडून येणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्याची वेळ येते. मात्र, स्वतःची इमारत नसल्यामुळे या ठिकाणी या महिलांनी कशा प्रकारे आपले दप्तर आणि रेकॉर्ड ठेवले आहेत, याचा विचार शासनाने केलेला दिसत नाही.

### पाऊस मंदावला तरी दारणा...

भाम ३६ टक्के, वालदेवी ४४.८४ टक्के, कडवा ४५.५० टक्के भरलेला आहे. कडवा धरणातून आतापर्यंत १०३ दलघफू पाण्याचा विसर्ग काल सकाळपर्यंत करण्यात आला. गंगापूर धरणाच्या पाणलोटात १० मिमी पावसाची नोंद झाली. आंबोलीला ६४ मिमी, त्र्यंबकला २१ मिमी, आणि गंगापूरमध्ये २४ तासांत ३०३ दलघफू नवीन पाणी दाखल झाले. १ जूनपासून या धरणात १६०५ दलघफू म्हणजेच १.६ टीएमसी पाणी नव्याने दाखल झाले. गंगापूरमधून काल सकाळपर्यंत एकूण ३४५ दलघफू पाण्याचा विसर्ग करण्यात आला. या धरणातून काल सायंकाळी ३९४४ क्युसेकने विसर्ग सुरू होता. गंगापूर समूहातील कश्यपी ४६.०६ टक्के भरले आहे. गौतमी गोदावरी २६.७१ टक्के भरले आहे. आळंदी २८.८० टक्के भरले आहे. पालखेड ५९.७२ टक्के, भोजापूर ६२.८८ टक्के भरले आहे. दारणा धरणातून ४०७९ क्यूसेक, गंगापूरमधून ३९४४ क्यूसेक, तर कडवामधून ७९५ क्यूसेक असा विसर्ग सुरू आहे. या धरणांमधील विसर्ग आणि पावसाचे वाहून येणारे पाणी यामुळे नांदुरमधमेश्वर बंधाऱ्यातून ११०७९ क्यूसेकने विसर्ग सुरू आहे. काल सकाळपर्यंत या बंधाऱ्यातून १ जूनपासून गोदावरीत ३.४ टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला.